म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे
विषय : (ले) बा.वा.
दा.क्र. : ६१०२

BVBK-0400102

किशोर आनंदमाला

संयोजक :– सौ. आशा भाजेकर

पुस्तक ६ वे

# इंद्रधनुष्य

लेखक

पंढरीनाथ रेगे

BVBK-0400102

प्रकाशन क्रमांक ११५

किमत दोन रुपये

प्रकाशिका :
सौ. निर्मला नारायण अरगडे
अरगडे कुलकर्णी प्रकाशन,
१६/२२४ लोकमान्यनगर,
पुणे ३०

प्रथमावृत्ती ऑगस्ट १९७३

© सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन

चित्रकार : एस्. के. परब

मुद्रक :
प्रभाकर सरदेसाई, *M.Sc.*
अक्षर मुद्रणालय,
४७ इंडस्ट्रियल इस्टेट,
लोणावळा (जि. पुणे)

# १. तीन जिवलग मित्र


खूप खूप वर्षांपूर्वी -- ब्रह्मदेशातील एका जंगलात एक कावळा, एक कासव नि एक हरीण असे तिघे मित्र होते. जंगलाजवळच्या एका तळ्याच्या काठी ते मैत्रीने राह्यचे वेळप्रसंगी एकमेकांना उपयोगी पडायचे.

एकदा काय झाले -- कुणीतरी पारधी शिकारीसाठी फिरता फिरता दुपारी सहज त्या बाजूला आला, तर तळ्याच्या जवळपासच्या जमिनीवर हरणाच्या खुरांचे ठसे उमटलेले त्याला दिसले त्याने तर्क केला-- तळ्यातले पाणी पिण्यासाठी हरीण इथे येत असले पाहिजे. तर त्याला आपण पकडायचे. म्हणून त्याने तिथे जाळे लावले नि तो घरी गेला हरीण रात्री जाळ्यात सापडला तर दिवस उजाडताना येऊन त्याला ताब्यात घ्यायचे, असे त्याने मनाशी ठरवले.

त्या दिवशी संध्याकाळ झाली, काळोख पडू लागला, तसा हरीण आपल्या मित्रांना भेटण्यासाठी धावतपळत ठरलेल्या जागी येऊ लागला. तर अंधारात पारध्याचे

जाळे त्याला काही दिसले नाही, आणि तो त्यात अडकला.

ठरलेल्या जागी कावळा सर्वांच्या आधी आला होता. कासवाच्या मंद गतीमुळे त्याला यायला नेहमीच जरा उशीर होई. पण हरणाची यायची वेळ टळून गेली तरी तो अजून कसा आला नाही—असा प्रश्न कावळ्याला पडला. म्हणून त्याचा शोध घेण्यासाठी कावळा उंचावरून उडत निघाला. तर, थोड्याच अंतरावर आपला मित्र हरीण पारध्याच्या जाळ्यात अडकलेला त्याला दिसला. हर-



णाची ती दशा पाहून कावळ्याचा जीव कळवळला. अेके झेपेसरशी तो खाली उतरला आणि हरणाच्या जवळ जाऊन

त्याला दिलासा देत म्हणाला, "मित्रा हरणा, तू मुळीच काळजी करू नकोस. आपला कासवराव आत्ता येईल. आम्ही दोघे मिळून तुझी सुटका केल्याशिवाय राहाणार नाही. थोडा दम धर." आणि शक्य तेवढ्या लवकर येण्याची सूचना कासवाला द्यावी, म्हणून तो येण्याच्या मार्गावर त्याचा शोध घेत कावळा पुन्हा उडत गेला. तर लवकरच त्याच्या नजरेला कासव पडले.कावळ्याने त्याला गाठले आणि सांगितले,

"मित्रा कासवा, आपला मित्र हरीण पारध्याच्या जाळ्यात सापडलाय. त्याची सुटका आपल्याला होईल तेवढ्या लवकर करायची आहे तर झटझट चल."

अखेर एकदाचे दोघेही मित्र हरणापाशी येऊन पोचले. हरणाला धीर देत कासवाने त्याच्याभोवतालचे जाळे आपल्या दातांनी कुरतडायला सुरुवात केली. जाळ्याचे धागे मऊ पडून कासवाला ते कुरतडण्यास सोपे जावे, म्हणून कावळा तळ्यातले पाणी आपल्या चोचीतून आणीत होता नि धाग्यांवर टाकीत होता.

पण पहाट होत आली तरी त्यांच्या प्रयत्नांना पुरेसे यश आले नाही. हरणालाबाहेर पडता येईल एवढे भोक जाळ्याला अजून पडले नव्हते. आता लौकरच दिवस उजाडेल आणि आपला मित्र हरीण पारध्याच्या तावडीत सापडेल, अशी भीती त्यांना वाटू लागली. म्हणून मग पारध्यावर पाळत ठेवण्यासाठी

कावळा बाजूच्या अेका उंच झाडावर जाऊन टेहळणी करीत बसला. कासवाचे जाळेकुरतडणे चालूच होते.

अखेरीस दिवस उजाडायला आला, आणि लांब-वरून चालत येत असलेल्या पारध्याला कावळ्याच्या तीक्ष्ण दृष्टीने हेरले. खांद्यावर भाला नि काखोटीला अेक मोठी शिकारी पिशवी लटकावून तो झरझर येत होता.

कावळा भर्कन उडत गेला नि कासवाला म्हणाला, "मित्रा कासवा, झटपट उरक बाबा. पारधी लांबून येताना दिसतोय."

"अरे, पण मी तरी काय करू? अजून पुरेसं मोठं भोक पाडता आलेलं नाही. आता रे काय करायच?"

त्यांचा हा संवाद ऐकून हरणाचा धीर सुटला. आता वेळीच धडपड केली नाही, तर आपण पारध्याच्या कचाट्यात सापडू, या भीतीने तो अस्वस्थ झाला. त्याने आपली सारी शक्ती एकवटली आणि जाळ्यातून बाहेर पडायला तो जिवाच्या आकांताने धडपडू लागला. कासवाने पाडलेल्या भोकातून त्याने शिगासकट नेटाने डोके बाहेर खुपसले. कासव नि कावळा यांच्या रात्र-भरच्या प्रयत्नांमुळे जाळे आधीच कमकुवत झाले होते, त्यात कासवाने पाडलेल्या भोकातूनच हरणाने जोराची मुसंडी मारली. त्या हिसक्याबरोबर जाळे तडातड तुटले आणि हरीण जाळ्यातून अेकदाचा बाहेर पडला. पारधी लौकरच येऊनठेपेल, त्याच्या तावडीतून आता निसटायला

हवे होते, म्हणून जंगलाकडे धावता धावता तो मित्रांना म्हणाला, "चला! तो माणूस यायच्या आधी जंगलात पळू या!"

संकटात सापडलेला हरीण दुसरा कसला विचार न करता वाऱ्यासारखा जंगलात पळाला कावळाही उंच उडत उडत पळून जाऊ शकत होता. पण कासवाचे काय? त्याची बिचाऱ्याची चाल मंद! पारध्याच्या तावडीतून तो कसा काय सुटणार होता? त्याच्याकडे पारध्याचे लक्ष गेले तर.... कावळ्याच्या डोक्यात हा विचार आला, आणि कासवाची काय गत होते ते पाहण्यासाठी तो झाडावर उंच बसून टेहळणी करीत राहिला.

तेवढ्यात पारधी तिथे येऊन पोहोचला. पाहतो तर काय–जाळे तोडून हरिण पसार झालेला. चरफडत त्याने आजूबाजूला नजर टाकली, तर... थोड्या अंतरावर कासव धडपडत जात असलेले दिसले. झटदिशी जाऊन पारध्याने त्याला पकडले, आणि खांद्यावरच्या पिशवीत कोंबले. "हरीण हातचा निसटला तरी कासव हाती आले." असे स्वतःचे समाधान करीत तो आपले तुटके जाळे घेऊन परत निघाला.

कावळा झाडावरून हे सारे पहातच होता. "आता कासवावर पाळी आली म्हणायची!" कावळा स्वतःशीच उद्गारला, "हरणाच्या मदतीनं याची सुटका करायला हवी!"

आणि कावळा वेगाने उडत हरणाचा शोध घेण्यासाठी जंगलात शिरला. हरणाला गाठून कावळा गडबडीने म्हणाला– "मित्रा हरणा, तू सुटलास खरा; पण तुझ्याऐवजी पारध्यानं आपल्या कासवाला पकडून पिशवीत कोंबलय नि घरची वाट धरलीय. चल–काहीही करून त्याची सुटका करू या."

"त्याची सुटका तर करायलाच हवी." हरीण म्हणाला, "पण ती करायचीं कशी?"

"मला एक युक्ती सुचलीय." कावळा म्हणाला, "पारधी जातोय त्याच्या वाटेवरच पुढं काही अंतरावर तू जायचं नि लंगडत चालायचं ढोंग करायचं. तू लंगडा झाला आहेस, तेव्हा तुला सहज पकडता येईल म्हणून काखोटीची कासवाची पिशवी खाली ठेवून तो तुझ्यामागं धावेल. त्याला चकवत चकवत हुलकावणी देत तू दाट रानात शिरायचं आणि मग चांगलीच झुकांडी देऊन पारध्याने पिशवी टाकली असेल, तिथं यायचं. मीही तिथंच असेन. चल झटपट ! वेळ दवडता कामा नये !"

कावळ्याच्या सांगण्याप्रमाणे हरणाने लंगडण्याचे नाटक केले. पारध्याचा समज झाला–जाळ्यातून धडपडत बाहेर पडताना हरणाची तंगडी दुखावली असेल आणि म्हणून तो लंगडत असेल ! धावत जाऊन आता त्याला सहज पकडता येईल ! ... नीट धावता यावे म्हणून खांद्यावरची पिशवी त्याने जमिनीवर एका बाजूला काढून ठेवली

आणि तो मोकळेपणाने हरणाच्या मागे धावला.

हरणाच्या मागे धावता धावता पारधी स्वत:शीच बडबडत होता, "आता कसा नि किती पळणार बच्चमजी? आता तुझी सुटका नाही !"

हरीण ठरल्याप्रमाणे पारध्याला हुलकावण्या देत दुडक्या चालीने पुढे पुढे जात होता. लंगडे हरीण कुठवर हुल-कावण्या देणार. लौकरच आपण त्याला पकडू, या घमेंडीत पारधी त्याच्या मागे जंगलात घुसला. एवढा घुसला की, हरणाच्या मागे आपण दाट जंगलात कुठल्याकुठे पोचलो, याचे भानही त्याला उरले नाही. अखेर हरणाने एक झुकांडी देऊन त्याला असा काही गुंगारा दिला की, पारधी-बुवा पार गोंधळून गेले! हरीण नजरेच्या टप्प्यात कुठे दिसेनासे झाले, तसा तो भानावर आला. हरीण तर पार पसार झालेच होते; पण माघारी परतायचे योजले तर परतीची वाटही धड सापडेना. बुचकळ्यात पडून तो दाट जंगलात घोटाळत राहिला.

इकडे हरीण शिताफीने वाट काढून, वेगाने धावत कासवाच्या पिशवीकडे येऊन पोहोचले तिथे कावळा पिशवीची राखण करीत बसला होता. कासवाला सुटकेचा दिलासा देऊन धीर देत तो हरणाची वाट पाहात होता. हरीण येताच कावळ्याची नि त्याची सल्लामसलत सुरू झाली. कासवाची तिथेच सुटका केली, तर त्याच्या मंद चालीमुळे तो पुन्हा पारध्याच्या तावडीत सापडण्याचा

धोका होता. म्हणून पिशवीसकट त्याला आधी जंगलात सुरक्षित जागी न्यायचे आणि तिथे पिशवीतून त्याला मोकळे करायचे असे शेवटी त्यांनी ठरवले.

बेत ठरताच हरणानें पिशवीची वादी आपल्या शिंगात अडकवली आणि पिशवी तशीच लटकावीत पारध्याच्या विरुद्ध दिशेने जंगलाकडे धाव घेतली. कावळा वरून उडत त्यांच्याबरोबर चालला होता. जंगलात सुरक्षित जागी पोचताच हरणानें शिंगावरची पिशवी जपून खाली टाकली; मग शिंगानेच झटका देऊन पिशवीचे झाकण उघडले आणि कासवाला एकदाचे मोकळे केले.

पारध्याला यावेळी चकवले खरे; पण पुन्हा त्याच्या तावडीत सापडायचे नाही, असे ठरवून ते तिघेही मित्र आता दुसऱ्या सुरक्षित जागी एकोप्याने राहू लागले.

## २. जादूची राख

कोणे एके काळची गोष्ट. जपानातली. एक म्हातारा आणि त्याची बायको आपल्या कुत्र्यासह राहात होती. त्या कुत्र्याचं नाव होतं शिरो. त्यांना मूलबाळ काही नव्हतं. म्हणून शिरोवरच त्यांची माया जडली होती. शिरोलाही त्यांचा लळा लागला होता. त्यांच्या घराची राखण तो इमानीपणे करी.

शेजारच्या घरी दुसरा एक म्हातारा आणि त्याची बायको रहात असत. तो म्हातारा होता स्वार्थी आणि दुष्ट. तो शिरोचा द्वेष करी व वारंवार त्याच्यावर खेकसे. कधी-कधी तर त्याच्यावर दगडही फेकून मारी.

अेके दिवशी काय झालं— शिरो बागेत भुंकत असल्याचं त्याच्या धन्याच्या कानी पडलं. म्हणून काय झालं ते बघायला तो बाहेर आला. त्याला पाहून शिरो धावत त्याच्याकडे आला नि त्याच्या सदऱ्याचं टोक तोंडात धरून त्याला ओढू लागला. तो काय करतो, कुठं नेतो ते पाहण्यासाठी धनी त्याच्याबरोबर जाऊ लागला.

शेवटी ओढीत ओढीत शिरोनं त्याला बागेच्या

टोकाशी असलेल्या एका झाडापाशी नेलं. मग त्या झाडाच्या मुळाकडली जमीन पायांनी उकरीत तो भुंकू लागला.

त्याचा मतलब धन्याच्या लक्षात आला. घरात जाऊन त्यानं फावडं आणलं आणि ती जमीन खणायला सुरुवात केली. आणि काय आश्चर्य— थोडंस खणून झाल्यावर त्याला अेक हंडा सापडला. आणि तोही साधा-



सुधा नव्हे तर सोन्यानं भरलेला. म्हाताऱ्यानं आपल्या बायकोला बोलावलं नि दोघांनी मिळून उचलून तो हंडा घरात नेला. एवढी संपत्ती मिळालेली पाहून दोघांनाही खूप आनंद झाला.

शेजारच्या त्या दुष्ट म्हाताऱ्यानं आपल्या खिड-

कीतून हा प्रकार हळूच बघितला होता. त्यानं काहीएक बेत ठरवला. दुसऱ्या दिवशी सकाळीच तो शिरोच्या धन्याकडे आला आणि म्हणाला "माझं थोडं काम करायचं आहे. तुमचा शिरो थोडा वेळ मला देता का ?"

शिरोच्या धन्याला काही मनातून ही गोष्ट आवडली नाही. तरीपण 'नाही' म्हणणं त्याच्या जिवावर आलं म्हणून तो म्हणाला – "ठीक आहे. शिरो तुमच्या उपयोगी पडण्यासारखा असेल तर जा घेऊन त्याला."

तो म्हातारा शेजारी लगेच शिरोला घेऊन आपल्या घरी गेला. आपल्या बायकोला म्हणाला – "हे बघ, आपण पण आता श्रीमंत होऊ."

मग त्यानं एक फावडं घेतलं नि शिरोला घेऊन तो आपल्या बागेत गेला. शिरोच्या धन्याला ज्या झाडाच्या मुळाशी सोन्याचा हंडा सापडला होता, तसलंच एक झाड याच्याही बागेत होतं. त्याच्यापाशी शिरोला नेऊन तो म्हणाला –"हे बघ शिरो, तुझ्या धन्याला तू सोनं मिळवून दिलंस तसंच मलाही दे बघू. चल, दाखव कुठं खणू ते."

शिरो बिचारा गप्पच राहिला. त्याला शेजाऱ्याच्या म्हणण्याचा काहीच बोध होईना. शिरो जागचा हलेना हे पाहून शेजाऱ्यानं त्याचं डोकं खाली वाकवलं. त्यानं दाबून धरल्यामुळे शिरोला काही निसटून जाता येईना. म्हणून तो पायांनी जमीन उकरू लागला.

झालं! त्या शेजाऱ्याला वाटलं की, आपलं काम झालं. शिरोनं जमीन उकरली तिथंच खाली सोन्याचा हंडा असणार, म्हणून शिरोला बाजूला सारून तो स्वतः फावड्यानं जमीन खणू लागला. मोठा खड्डा खणून झाला; पण हंडा सापडण्याचं काही चिन्ह दिसेना! खोलवर खणल्यामुळं चिखल मात्र निघाला. ते पाहून शेजारी संतापला खेकसून शिरोवर ओरडला— "हट्, तुझ्या धन्याला सोन्याचा हंडा मिळवून दिलास नि मला मात्र हा चिखल. अं? कपाळकरंटा कुठला! मर जा एकदाचा!"

आणि रागानं त्यानं हातातलं फावडं शिरोच्या डोक्यात घातलं. तो घाव शिरोच्या वर्मावर बसला. त्यामुळे तो बिलकूल आवाज न करता जागच्या जागी मरून पडला.

थोडे दिवस असेच निघून गेले. शिरोला अजून कसा परत केला नाही हे त्याच्या धन्याला कळेना. म्हणून त्याची चौकशी करण्यासाठी तो म्हातारा शेजाऱ्याकडे गेला. आणि विचारू लागला, "अहो, आमच्या शिरोचं काम झालं असेल ना? – त्याला देऊन टाका परत."

"तुमचा शिरो?" तो दुष्ट शेजारी बेपर्वाइनं म्हणाला, "कपाळकरंटा मेला! ठार मारून टाकला परवा मी त्याला."

"मारून टाकला?" शिरोच्या धन्यानं अचंब्यानं

विचारलं. शिरोला मारल्याचं ऐकून त्याला कमालीचं दुःख झालं. तो कळवळून म्हणाला– "का हो मारलंत तुम्ही त्याला? आणि इतके दिवस तुम्ही ही गोष्ट मला सांगितली का नाही? "

"अहो, तुमचा कुत्रा निघाला कपाळकरंटा." शेजारी सांगू लागला, "माझं काम नीट करायचं सोडून त्यानं उलट ते बिघडवून टाकलं. तसा मला आला राग. टाकला लगेच मारून."

हे ऐकून शिरोच्या धन्याच्या डोळ्यातून आसवं गळू लागली. जणू त्याचं मायेचं माणूस मरण पावलं होतं. दुःखानं सुस्कारत तो म्हणाला – "अरेरे ! ...... काय केलंत हे ? बिच्चारा माझा शिरो ! आता एवढं तरी करा, त्याचं प्रेत तरी माझ्याकडे द्या. ते नेऊन माझ्या बागेत तरी पुरतो."

"ते आता कुठून देऊ? ते तेव्हाच माझ्या बागेत एका झाडाच्या मुळाशी पुरून टाकलं." शेजाऱ्यानं सांगून टाकलं.

आता तर बोलणंच खुंटलं. शिरोच्या म्हाताऱ्या धन्याला थोडा वेळ काही बोलणं सुचेना. त्याच्या डोळ्यातून आसवांच्या धारा सारख्या वहात होत्या. थोडा वेळ विचार करून शेवटी तो शेजाऱ्याला म्हणाला,

"हे पहा, आता असं करा. माझ्या लाडक्या शिरोला तुम्ही ज्या झाडाच्या मुळाशी पुरलंय ते झाड तरी मला विकत द्या. "

या गोष्टीला तो शेजारी कबूल झाला. मग ठरल्याप्रमाणं त्या झाडाचे पैसे शिरोच्या धन्यानं दिले. ते झाड तोडलं नि आपल्या घरी नेलं. त्याच्या बायकोला शिरोची हकीकत कळली, तेव्हा त्याची आठवण काढीत तीही रडू लागली.

शिरोला 'मोची' हा जपानी खाद्यपदार्थ आवडायचा म्हणून त्या तोडलेल्या झाडाचा एक तुकडा कापून त्याच्या धन्यानें त्याचा एक लहानसा खलबत्ता बनवला. 'मोची' पदार्थ बनवण्यासाठी ती नवराबायको त्यात बाजरी कुटू लागली. कुटता कुटता ती शिरोला उद्देशून बोलत. तो समोर जिवंत बसला आहे असं मानीत नि त्याच्याशी गप्पागोष्टी करीत ती म्हणत...

"बेटा शिरो, तुझ्यासाठी मोची बनवतोय् रे! तुला आवडते ना ती?"

मोची तयार झाल्यावर त्याच्या नावानं ती शिरोचा वाटा काढून बाजूला ठेवीत. हा प्रकार त्या दुष्ट शेजाऱ्याला समजला. तेव्हा दुसऱ्या दिवशी तो शिरोच्या धन्याकडे आला. साळसूदपणे म्हणाला "मला थोडी बाजरी कुटून मोची बनवायचीय, तर जरा तुमचा खलबत्ता द्या. काम झाल्यावर परत आणून देतो."

शिरोच्या धन्याच्या मनात प्रथम आलं की, देऊ नये. अशा माणसाला का म्हणून द्यावा? पण तो सज्जन होता. लगेच त्याला वाटलं दुसरा कसाही वागला तरी

आपण दुष्टपणा करू नये. म्हणून खलबत्ता शेजाऱ्याला देत तो म्हणाला– "हा घ्या; पण काम होताच लगेच परत आणून द्या बरं."

तो खलबत्ता घेऊन शेजारी आपल्या घरी गेला.

असेच काही दिवस गेले. पण तो खलबत्ता परत देण्याची गोष्ट काही तो शेजारी काढीना. शेवटी शिरोचा धनीच त्याच्या घरी गेला. म्हणाला– "अहो, तुमचं काम झालं असेल ना? माझा खलबत्ता आता परत द्या ना!"

"तुमचा खलबत्ता हवा होय तुम्हाला?" तो दुष्ट शेजारी वेडंवाकडं हसत म्हणाला, "तो आता नाही मिळू शकणार तुम्हाला. हा नुकताच फोडून शेगडीत टाकला बघा."

"माझा खलबत्ता आगीत टाकलात तुम्ही?" शिरोचा धनी दुःखानं म्हणाला, "आगीत टाकून काय मिळालं तुम्हाला?"

तो दुष्ट शेजारी तोंड वेंगाडून म्हणाला– "हं! काय मिळालं म्हणजे? अहो, दर वेळी त्यात मी बाजरी कुटू लागलो रे लागलो की त्याच्या लाकडातून काळा घाणेरडा चिखल बाहेर येऊ लागला. माझ्या मोचीची नासाडी होऊ लागली– मला आला संताप. म्हणून फोडून त्याचे तुकडे केले नि दिले टाकून त्या शेगडीत."

समोरच्या जळत्या शेगडीकडे शिरोचा म्हातारा

धनी दुःखानं पाहू लागला. विचार करून मग तो म्हणाला— "माझा खलबत्ता तर तुम्ही जाळलातच. त्याची आता राख बनली. मेहरबानी करा नि त्याची ती राख मला द्या. ती तरी मी घरी नेईन."

राख न्यायला काही त्या दुष्ट शेजाऱ्याला नकार देता येईना. शेवटी त्यानं दिलेली राख घेऊन जड मनानं म्हातारा आपल्या घरी परतला. मग ती राख नेऊन त्यानं आपल्या बागेत सगळीकडे शिंपडली. तो काय नवल ? चेरी झाडांना मोहोर येण्याचा हंगाम नव्हता, तरीसुद्धा त्या झाडांच्या मुळांवर ती राख पडताच ती झाडं अचानक तरारून मोहोरली. ही नवलाची गोष्ट पाहून तो हर्षभरित झाला. लगेच त्यानं आपल्या बायकोला बागेत बोलावलं नि झालेला चमत्कार दाखविला.

म्हाताऱ्याच्या बागेतल्या या चमत्काराची बातमी पसरत पसरत राजवाड्यापर्यंत जाऊन पोचली. ती ऐकून राजपुत्रानें आपला जासूद त्याच्याकडे पाठविला. जासूद येऊन म्हणाला – "राजपुत्राच्या बागेत त्याच्या आवडीचं चेरीचं एक सुंदर झाड होतं. पण दुर्दैवाने ते मरून गेलं. सारी पानंही गळून पडली आणि तेव्हापासून त्याचं कशाकडे म्हणून लक्ष लागेनासं झालंय. तुमच्याकडल्या चमत्काराची गोष्ट ऐकून मी आलोय. ती खरी असली, तर तुमची ती जादूची राख घेऊन माझ्याबरोबर या नि राजपुत्राच्या त्या आवडत्या झाडावर शिंपडा."

राजपुत्राचं आमंत्रण ऐकून म्हातारा चकित झाला. तरीपण ती खलबत्त्याची राख घेऊन तो त्या जासूदाबरोबर निघाला.

राजपुत्राकडे जाताच त्यानं म्हाताऱ्याचं चांगलं स्वागत केलं. आणि आपल्या मरगळलेल्या झाडाला मोहर आणण्याची त्याला विनंती केली.

म्हाताऱ्यानं ती राख नेऊन राजपुत्राच्या चेरीच्या मेलेल्या झाडावर शिंपडली आणि पुन्हा चमत्कार घडला.! .... काही क्षणातच ते झाड जिवंत झालं नि मोहरलं.

हा चमत्कार पाहून राजपुत्र खूपच खूष झाला. लगेच त्यानं म्हाताऱ्याला सोन्याचांदीनं भरलेलं तबक बक्षीस दिलं नि मोठ्या सन्मानानं त्याची पाठवणी केली. एवढंच नव्हे, तर 'झाड मोहरविणारा जादुगार म्हातारा' असा किताब राजपुत्रानं त्याला बहाल केला.

ही गोष्ट त्या दुष्ट शेजाऱ्याला अर्थातच कळली. तो मनात म्हणाला–"ठीक आहे. मलाही असा चमत्कार घडवून आणता येईल की! माझ्याच शेगडीतली तर राख नेऊन त्यानं शिंपडली. माझ्या शेगडीतली खूप राख आहे माझ्यापाशी."

आणि मग काय विचारता? आपल्याकडल्या राखेनं एक करंडी भरून घेतली नि स्वारी बाहेर पडली. राजपुत्राच्या दारावरून जाणाऱ्या रस्त्यावर पोचताच तो

पुकारू लागला... "झाडं मोहरविणारा जादूगार म्हातारा आलाय्. वाटेल तेव्हा झाडांना मोहर आणता येतो बघा."

तो पुकार राजपुत्रानं ऐकला. तेव्हा तो आपल्या नोकराला म्हणाला–"अरे, तो बघ झाडं मोहरविणारा जादुगार म्हातारा आलाय. बोलावून घे त्याला. आणखी काही झाडं मोहरून घेऊ."

नोकरानं बोलावताच तो दुष्ट म्हातारा राजपुत्राकडे आला. राजपुत्रानं विचारलं "झाडं मोहरविणारा म्हातारा ना तू? पण तुझा चेहरा तर वेगळा दिसतोय." "हो. मीच खरा झाडं मोहरविणारा, महाराज." तो दुष्ट म्हातारा ठासून म्हणाला, "तो पहिला आला होता ना– तो माझा शिष्य."

मग राजपुत्रानं त्याला एक झाड दाखवलं नि त्याला मोहर आणायला सांगितलं.

त्या दुष्ट म्हाताऱ्याने आपल्या करंडीतील राख त्या झाडावर शिंपडली. पण त्याला मोहर काही येईना. म्हणून आणखी–आणखी राख तो शिंपडू लागला. पण जरासुद्धा मोहर येईल तर शपथ! वाऱ्याबरोबर ती राख राजपुत्राच्या डोळ्यात मात्र गेली नि ते दुखावले. त्यातून पाणी वाहू लागले. त्याबरोबर राजपुत्र चिडला नि नोकराला म्हणाला–

"हा खरा झाडं मोहरविणारा म्हातारा नाही. बनवेगिरी करणारा भोंदू आहे हा. याला नेऊन तुरूंगात

टाका."

झालं! त्या दुष्ट म्हाताऱ्याला लगेच तुरुंगात नेऊन डांबण्यात आलं.

शिरोचा धनी– झाडं मोहरविणारा खरा जादुगार म्हातारा मात्र आपल्या बायकोसह सुखानं रहात होता. त्याची कीर्ती हळुहळू देशभर पसरली. आपल्या लाडक्या शिरोची मात्र त्याला वारंवार आठवण येते.

९०२
किशोर

## ३. बोलके भांडे

कोणे एकेकाळची गोष्ट, एका नगरात भिकोबा नावाचा एक अत्यंत गरीब शेतकरी होता. इतका गरीब की– बायकोसह तो ज्या घरात राहायचा ते लहानसे घर नि एक गाय एवढीच काय ती त्याच्या मालकीची होती. आणि काही दिवसांनी तर त्याची गरिबी एवढी वाढली की शेवटी ती गायही विकण्याची पाळी त्याच्यावर आली.

म्हणून ती एकुलती एक गाय घेऊन ती विकायला भिकोबा बाजाराकडे निघाला. तर वाटेत त्याला एक

देखणा अनोळखी माणूस भेटला. त्याने 'राम राम' करून भिकोबाला विचारले–

"ही लठ्ठ गाय घेऊन चाललात कुठं राव?"

खरे म्हणजे ती गाय काही लठ्ठ नव्हती तरीपण तो अनोळखी माणूस तोंडदेखले तिला 'लठ्ठ' म्हणतोय तर म्हणेना बापडा, असे मनाशी म्हणत भिकोबा म्हणाला–

"बाजाराला नेतोय विकायला."

"मग.... ती मला विकत द्यायला हरकत नसेल तुमची?" तो अनोळखी माणूस बोलला.

कुणालाही ती विकायची होती. अर्थात त्या माणसालाही ती विकण्यास भिकोबा तयार होता. वाटेतच सौदा पटला, तर बाजाराला जायचे श्रम वाचणार होते की! भिकोबाने त्याला किंमत सांगितली– "किमान शंभर रुपये पडतील."

त्यावर तो माणूस मान हालवीत बोलला–"अं-हं! पैसे नाही बुवा मिळायचे माझ्याकडनं. माझ्याकडे हे अद्भूत भांडं आहे. हे तुझ्या आयुष्यात चमत्कार घडवून आणील बघ. हे घेऊन ह्याच्या बदली गाय देतोस तर पहा!"

–आणि खाकोटीला कडीने अडकविलेले तीन पायांचे एक लोखंडी भांडे त्याने भिकोबाला दाखविले.

खरे सांगायचे म्हणजे ते भांडे साधे, लोखंडी जाडसर पत्र्याचे पण ओबडधोबड, काळपट दिसत होते. अद्भूत असावे असे काही वाटत नव्हते. भिकोबाला त्याचा असा

कोणता उपयोग होणार होता? एवढ्या मोठ्या भांड्यात शिजवण्याएवढे धान्य तरी कुठे होते त्याच्याकडे? अर्थात तो सौदा त्याला पटण्यासारखा नव्हता. तो म्हणाला "मला आहे पैशांची गरज तेव्हा पैसे नसतील तर, मग भांडं आपलं राहुदे तुझ्याकडं."

पण भिकोबाचे बोलणे पुरे होते-न-होते एवढ्यात ते भांडेच त्याला विनवीत म्हणाले—"पैशासाठी अडवून धरू नकोस. गायीच्या बदली मला खुशाल घे तू. पहा तर खरं— मला घेतल्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी तुझ्यावर कधीसुद्धा येणार नाही."

ते भांडे बोलके आहे हे पाहून भिकोबा चकित झाला. त्याच्या मनात आले— हे भांडे बोलके आहे त्या अर्थी इतर काही नवलाईच्या गोष्टीही ते करीत असेल!

ठीक आहे! घेऊन टाकूया. हाही एक नवलाईचा अनुभव घेता येईल! ... म्हणून त्याने आधीचा बेत बद-लला आणि तो सौदा पुरा केला.

घरी परतल्यावर भिकोबाने ते भांडे प्रथम गाईच्या गोठ्यात लपवून ठेवले. कारण, आपल्या बायकोला त्याला चकित करून सोडायचे होते. मग घरात जाऊन तो बायकोला म्हणाला, "बरं का कारभारणी, बाजारातून एवढा दमूनभागून आलोय् तर काही खायलाप्यायला दे 'की!"

पण बाजारात गाय विकून घरधन्याने किती पैसे

आणले हे कळल्याशिवाय कारभारीण काहीही द्यायला तयार नव्हती. तिने विचारले, "गाईचा सौदा चांगला केला की नाहीत ते आधी सांगा!"

"हो! चांगला म्हणजे चांगलाच केला." घरधनी उत्तरले.

"मग ठीक आहे," मान डोलावीत कारभारीण म्हणाली, "हो! कितीतरी गोष्टींसाठी पैसे हवेत आपल्याला."

"प-पण सौदा पैशांचा नाही केला मीं!" भिकोबा पुटपुटला.

"आं?" कारभारीण आश्चर्यानें उद्‌गारली, "म्हणजे ? ... म्हणता काय तुम्ही ? गाईच्या बदली पैसे नाही आणलेत तुम्ही ? मग आणलंत तरी काय? दाखवा पाहू आधी काय आणलंत ते ?"

गाईच्या बदली काय आणले ते पाहिल्याशिवाय कारभारणीला चैन पडणार नव्हते. शेवटी तिला गोठ्यात नेऊन ते तीन पायांचे भांडे भिकोबाला दाखवावे लागले.

ते काळपट लोखंडी भांडे पाहिल्याबरोबर कारभारणीचा तिळपापड उडाला. ती गरजली– "आपलं सोन्यासारखी गाय देऊन हे फडतूस भांडे घेऊन आला तुम्ही? तुमच्या या मूर्खपणाला म्हणावं तरी काय? शिजवायला अन्नच नाही, तर या भांड्याचं काय करायचं डोंबलं का शिजवायचं याच्यात ?"

आणि ती रागारागाने नवऱ्याला धरून घुसळू लागली. पण त्या गरीब बिचाऱ्यावर आणखी काही अतिप्रसंग ओढवण्यापूर्वी ते भांडेच खुद्द बोलू लागले— "मला घासूनपुसून चकमकीत करा आणि चुलीवर ठेवा. मग पहा चमत्कार! "

भांडेच बोललेले ऐकून कारभारीण चकित झाली. ती शांत होऊन म्हणाली, "तुला बोलता येतंय् त्याअर्थी आणखी काही गोष्टीही करता येत असतील. पाहूया तर खरं! ... "

आणि मग तिने घासूनपुसून चकचकीत करून ते भांडे चुलीवर ठेवले.

"मी टुण्टुण् उड्या मारीत जाते," ते भांडे बोलले.

"पण कुठं? " कारभारणीने विचारले.

"टेकडीवरल्या सावकाराच्या वाड्यात." आणि बोलता बोलता ते टुण्टुण् उड्या मारीत घराबाहेर पडले नि रस्त्याला लागलेसुद्धा. लौकरच त्याने सावकाराचा वाडा गाठला. वाड्यातल्या सैपाकघरात सावकारीणबाई साखरभात पुरणपोळी, अशी नाना पक्वान्नं करीत होती. ते भांडे आपले चुलीपाशी जाऊन गुपचूप बसले. त्याच्यावर नजर जाताच सावकारीणबाई स्वतःशीच उद्‌गारली— "अगबाई! हे भांडं इतक्यात कुणी आणून ठेवलं? साखरभाताला एवढंच भांडं हवं होतं मला. लख्ख पण दिसतंय्.

छान झालं बाई! – आणि तिने ते चुलीवर ठेवून त्यात साखरभात केला. मग तिनें ते भांडे खाली उतरलें. तर काय? ते टुणटुणत खोलीबाहेर चालू लागले.

"अरे-अरे! ..." सावकारीण आश्चर्यानें उद्गारली.

"काय चालवलंस काय बये तू? चाललीस कुठं?"

"माझं काम झालं! जिथनं आले तिथं जायला हवं मला." भांडे बोलले; आणि तडक टुणटुणत टेकडी उतरून ते भिकोबाच्या घरी येऊन दाखल झाले

साखरभात– चांगला केशरी साखरभात भरून घेऊन ते भांडे आलेले पाहताच भिकोबा व त्याची बायको हरखून गेली. भिकोबा बोलला– "हं! बोला आता कारभारीणबाई, आपल्या भुक्कड गाईच्या बदल्यात या अद्भूत भांड्याचा मी सौदा केला ते फक्कड झालं की नाही?"

"हो बाई!" कारभारणीने वरमून कबूली दिली, आणि घरधन्याबरोबर ती भांड्यातला तो फक्कड साखरभात ओरपीत बसली.

दुसऱ्या दिवशी सकाळी कारभारणीने पुन्हा ते भांडे धुवूनपुसून लख्ख करून ठेवले. त्याबरोबर ते बोलले "जाते मी टुणटुणत."

"हे! पण आता कुठं?" कारभारणीनें विचारले.

"त्याच– सावकाराच्या घरी त्याच्या धान्याच्या

कोठारात." आणि बोलता बोलता ते टुण्टुण् उड्या मारीत वाटेलाही लागले.

सावकाराच्या धान्याच्या कोठारापाशी त्याचे नोकर गव्हाची रास करीत होते. तिथं त्यांच्या बाजूला जाऊन ते भांडे गुपचूप बसून राहिले. एका नोकराचे लक्ष त्याच्याकडे गेले. ते पाहून तो म्हणाला, "कुडवभर गहू राहील याच्यात. पोत्यात गहू भरायला चांगलं भांडं मिळालं की !"

आणि त्यानें लगेच त्या भांड्यात कुडवभर गहू भरला. पण तेवढ्या गव्हाने ते भांडे पूर्ण भरायचे तर सोडाच, पण पावही भरले नाही. म्हणून त्या नोकराने आणखी कुडवभर गहू त्यात ओतले. तर ते भांडे जेमतेम पाव हिस्सा भरले. अखेर ते तुडुंब भरेपर्यंत कित्येक कुडव गहू त्यात रिचले हा चमत्कार पाहून सारे नोकर अचंबित झाले. आश्चर्याने उद्गारले—"अरेच्चा ! हे भांडं आहे की हौद ?"

मग सर्वजण मिळून ते भांडे उचलून कोठारात नेऊ लागले. तर ते त्यांच्या हातून जे निसटले ते टुण्टुण् करीत पार पळत सुटले. ते पाहून थक्क झालेले ते नोकर अचंब्याने विचार करू लागले—"काय करतेयस काय तू ? कुठं चाललीस बये तू ?"

"जिथनं आलेय् तिथं परत जायला हवं मला. माझं काम झालं." —आणि बोलता बोलता, धावतपळत मागे

लागलेल्या त्या नोकरांना गुंगारा देऊन ते भांडे तडक भिकोबाच्या घरी येऊन दाखल झाले. घरात शिरल्याबरोबर भरून आणलेला सारा गहू त्याने खाली ओतला. तर त्याची केवढी मोठी रास झाली. त्यांना महिनेंच्या महिने पुरेल एवढा गहू होता तो. दोघेही नवराबायको ती रास पाहून कोण आनंदित झाली !

पण एवढ्याने धन्याचे भले करण्याची त्या भांड्याची कामगिरी पुरी झाली नव्हती. तिसरा दिवस उजाडल्याबरोबर ते पुन्हा बोलले, "हं ! मी चालले हं !"

कारभारणीने विचारले – "आता कुठे पुन्हा ?"

"त्याच श्रीमंत सावकाराच्या घरी !"– आणि बोलता बोलता ते टुणटुणत निघालेसुद्धा.

यावेळी तो सावकार आपल्या खाजगी खोलीत बसून पैसे मोजीत होता. हे भांडे गुपचूप आत शिरले आणि त्याला नकळत त्याच्या बाजूला बसून राहिले. सारे पैसे मोजून झाल्यावर सावकाराचे लक्ष एकाएकी त्या भांड्याकडे गेले. ते पाहून त्याच्या मनात आले, नाणी भरून ठेवायला हे भांडे नामी आहे. तोंड झाकून कपाटात लपवून ठेवले की झाले. हे लोखंडी भांडे पाहून त्यात पैसे, मोहरा असतील अशी शंकासुद्धा कुणाला येणार नाही.

आणि खूष होऊन त्याने त्या भांड्यात पशापशांनी मोहरा भरायला सुरुवात केली. तर त्यात मोहरांची सारी रास मावली. मग कडीला धरून ते भांडे तो भिंतीतल्या

कपाटात–फडताळात नेऊ लागला. परंतु ते भांडे लगेच त्याच्या हातून निसटले आणि टुण्‌टुणत धूम पळू लागले.

"अरे ए, थांब, थांब!" सावकार ओरडला, "माझे सारे पैसे भरलेयत् तुझ्यात."

"हो ! पण ते आता तुझे नाही राहिलेत," भांडे बोलले, "जिथनं आले तिथं–माझ्या गरीब धन्याला नेऊन द्यायचेयत् ते मला."– आणि बोलता बोलता, हां-हां म्हणता ते सर्‌सर् पळत सुटले. सावकाराने त्याचा पाठलाग चाल-



वला; पण त्याच्या हातावर तुरी देऊन ते जे निसटले ते भिकोबाच्या घरी येऊन पोचले. घरी परत येताच ते सरळ आतल्या खोलीत गेले, आणि आणलेली संपत्ती ओतूनही रास

२/केली सोन्याच्या मोहरांची ती मोठ्ठाली रास पाहून भिकोबा आणि त्याची बायको यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

"हं ! आता तुमची कायमची ददात मिटली." ते भांडे बोलले.

"हो !" दोघेही नवराबायको हर्षभराने उद्गारली, "जन्मभर बघायला नको."

आणि कारभारणीने ते भांडे धुवूनपुसून लख्ख केले आणि नीट एका बाजूला ठेवून दिले.

दुसरा दिवस उजाडल्यावर कारभारीण उठून पाहते तर ते भांडे जाग्यावर नाही. दोघाही नवराबायकोंनी खूप-धुंडाळले पण त्याचा पत्ता लागेना. लागणार कसा ? ती निजून उठण्यापूर्वीच त्याने गुपचूप त्यांचा निरोप घेऊन ते घर कायमचे सोडले होते.

## ४. बापसे बेटा सवाई....

दक्षिण भारतातील लोककथा. एका शहराजवळच्या आडगावी चेंगन नावाचा अट्टल चोर राहात होता. आतापर्यंत त्यानं शहरांतून बेमालूम चोऱ्या केल्या होत्या आणि आपल्या कुटुंबाचा निर्वाह चांगला चालविला होता. पण आता तो म्हातारा होत चालला होता आणि त्याचा एकुलता एक मुलगा छोटा तर होता अवघा दहा वर्षाचा. चोरीचे बारीकसारीक धडे त्याने छोटयाला दिले होते.

पण छोटा नाही म्हटलं तरी, अजून तसा लहानच. इतक्यातच त्याला या धंद्यातील सर्व युक्त्याहिकमती नीट समजावून सांगता येण्यासारख्या काही नव्हत्या. म्हणूनच चेंगनला काळजी पडली होती की, आपल्या उरलेल्या थोडक्या आयुष्यात छोटयाला चोरी करण्यात तरबेज करणं आपल्याला शक्य दिसत नाही. अशा स्थितीत या मुलाचं पुढं कसं व्हायचं?....

परंतु छोटा हुशारीनं बापाला म्हणाला– "माझी

बिलकूल काळजी करू नका तुम्ही. तुमच्याएवढा अट्टल नसलो तरी हळुहळू पटाईत चोर होईन बघा मी."

"वाः वाः!" बाप हसत उद्गारला, "हिंमत तर मोठी दिसते बेटा तुझी. पण थोडं कसब दाखवशील तर खरं? मग खात्री पटेल!"

एके दिवशी चेंगन जरा आजारी म्हणून घरीच राहिला होता. छोटा चोरीचं कुठं काही जमतं का, हे पाहण्यासाठी गावच्या विहिरीवर गेला. तिथूनच शहराची वाट जात होती. वाटसरूंची गमंत बघत छोटा विहिरीपाशी उभा होता. दुपार झाली तशा गावच्या बायका विहिरीवर पाणी नेईनाशा झाल्या. त्यांचं पाणी भरणं आता संपलं होतं. शहराच्या रस्त्यावरचे वाटसरूही आता तुरळक दिसत होते तेवढेच.

अजून बारीकसारीक चोरीही साधली नाही म्हणून छोटा निराश होत आला होता. बापाला आपली काहीतरी करामत आज दाखवायची, असा बेत गुपचूप मनात योजून तो आला होता. पण....

एवढ्यात शहराच्या रस्त्यानं येणारा कुणीतरी दांडगट नवखा वाटसरू छोट्याच्या नजरेस पडला. त्याच्या डोक्याला पागोटं होतं आणि पाठुंगळीला तीनचार गाठोडी होती. शहरातून त्यानं काहीतरी माल आणलेला असावा. तो माणूस विहिरीजवळ येऊ लागला, तसं छोट्याच्या बेरकी नजरेनं हेरलं की हा माणूस चोर असला पाहिजे

आणि शहरात चोरलेला माल दुसरीकडं कुठतरी विकायला चालला असला पाहिजे. त्याला चकवण्याची शक्कल छोटयाच्या डोक्यात चमकून गेली. लगेच विहिरीकडे तोंड करून तो रडण्याचं ढोंग करू लागला.

तो परका माणूस खरोखरीच चोर होता. छोटयाच्या कानात सोन्याचे डूल असल्याचं त्यानं लांबूनच हेरलं होतं. जवळपास कुणी नाहीसं पाहून, पोराला बनवून ते डूल पळवायचे, असा बेत योजून तो छोटयाकडं येत होता.

तो माणूस जवळ आलेला पाहून छोटया रडण्याचं जास्तीच ढोंग करू लागला. त्याला समजावण्यासाठी चोरानं आपल्याकडील मिठाई त्याला देत म्हटलं, "बाळ, रडू नकोस असा ही घे छान-छान मिठाई!"

त्यानं दिलेली मिठाई एका हातात घेऊन छोटया अधिकच मोठयाने रडू लागला, "अरे, उगी उगी! एवढं रडायला झालं तरी काय?"

छोटा मुसमुसत सांगू लागला, "आम्ही मुलं-मुलं विहिरीत दगड फेकून भाकऱ्यांचा खेळ खेळत होतो. खेळता-खेळता माझ्या गळ्यातली सोन्याची सरी विहिरीत पडली. विहिरीत तसं जास्त पाणी नाही, पण आत उतरून ती काढून द्यायला कुणीच तयार होईना, लहानांबरोबर मोठी मुलंही घरोघर पसार झाली. मी तर एवढासा मुलगा, विहिरीत कसा उतरणार? आता गळ्यातली सरी

मी हरवली म्हणून घरी बाप मला मरेपर्यंत मारील. मोठा रागीट आहे तो."

—आणि छोटा डोळे पुसत पुन्हा स्फुंदू लागला.



छोटयाची कथा ऐकून तो चोर मनातून खूष झाला. छोटयाच्या कानातले सोन्याचे डूल पळविण्याचा त्याचा पहिला बेत होता. आता तर काय सोन्याची सरीच मिळण्याची सुवर्णसंधी चालून आली. तो मनात म्हणाला, "विहिरीत उतरून आधी सरी काढू. ती गुपचूप कंबरपट्टयात लपवून परत वर येऊ. पोराला सांगू- "सरी काही मिळू शकली नाही बाबा." तो पुन्हा रडायला लागला तर ..... रडता-रडताच त्याच्या कानातले डूल खेचून घ्यायचे नि पोबारा करायचा! ... बसू दे रडत बेटयाला! आप-

त्याला संपत्तीच संपत्ती! ... काल रात्रीप्रमाणे आजचाही दिवस भाग्याचा दिसतो. आता काही दिवस चोरी करण्याची कटकट नाही! ..."

आणि मग तो छोटयाला म्हणाला, "काही काळजी करू नकोस. मी विहिरीत उतरतो नि देतो तुला सरी काढून. मग झालं?" रडायचं नाही आता. माझी ही गाठोडी इथं ठेवतो, त्यावर जरा नजर ठेव म्हणजे झालं!"

गाठोडी खाली ठेवून चोर विहिरीत उतरला. त्याबरोबर ती सारी गाठोडी पाठीशी मारून छोटयानं धूम पळत आपलं घर गाठलं. पोरानं एवढी कसली गाठोडी आणली, ते बापाला समजेना. धावून-धावून धाप लागल्यामुळं छोटयाच्या तोंडून लगेच नीट शब्दही फुटेना. म्हणून चेंगनने गाठोडी खोलली. तर काय सोन्याचांदीचे दागिने आणि पैशांची पुरचुंडी.

चेंगन चोऱ्या करीत-करीत म्हातारा झालेला. पण आपल्या एवढ्याशा पोरानं एका खेपेला एवढी संपत्ती आणलेली पाहून तो थक्क झाला! आश्चर्यानं त्यानं विचारलं– "अरे, कुठं एवढा लग्गा साधलास?"

एका चोराला आपण कसं बनवलं, सरी शोधून काढायला त्याला विहिरीत कसं पाठवलं आणि त्याचा चोरीचा माल कसा पळवून आणला, याचं रसभरीत वर्णन मग छोटयानं केलं. ते ऐकून स्वतः अट्टल चोर

असूनही चेंगन पोराच्या कर्तबगारीवर बेहद्द खूष झाला, मनमुराद हसला. छोटयाला जवळ घेऊन त्याची पाठ थोपटीत तो समाधानानं उद्गारला–

"बेटा, तू तर कमाल केलीस! तुला रे मी आणखी काय शिकवायचे? माझ्यापेक्षा सवाई हिकमती आहेस तू?"

## ९. लोभी सुलतान

कोणे एके काळी अफ्रिकेतील एका छोटयाशा देशाचा एक सुलतान होता. तो होता पैशांचा भारी लोभी. त्यानं अमाप पैसा साठवला होता. पण एवढं असूनही त्याला स्वस्थपणा, निश्चितपणा नव्हता. तो सारखा बेचैन असे. कारण, त्याला भीती वाटायची की, कधीतरी आपल्या वाडयावर दरोडा पडेल आणि दरोडेखोर आपली संपत्ती लुटून नेतील ! या काळजीमुळं त्याला नीट झोपही येत नसे.

चोर-दरोडेखोरांना आपलं धन सापडू नये म्हणून वाडयाच्या उंच मनोऱ्यातील एका छोटयाशा खोलीत त्यानं ते लपवून ठेवलं होतं. आणि बाजूच्याच खोलीत

त्यानं आपली मुलगी ठेवली होती.

मक्केला जाऊन पुण्य लागतं अशी मुसलमानांची श्रद्धा असते. अर्थातच सुलतानालाही वाटायचं– आपणही मक्केची यात्रा करावी. म्हणून तो आपल्या सल्लागारांना विचारायचा– "मक्केला जायला किती खर्च येतो ?"

अमुक-अमुक खर्च येईल असं सल्लागार सांगायचे. त्यावर हा म्हणायचा– "एवढा खर्च म्हणजे फारच झाला की ! आपल्याला नाही एवढा परवडायचा ! चांगले पैसे साठले की जाईन."

एकदा काय झालं– एक मुसलमान भिकारी सुल-



तानाकडं आला, 'पैसा-दोन पैसे द्या' म्हणून भीक मागू लागला.

"पैसे ? पैसे कशाला हवेत रे तुला?" सुलतानानं रोखठोक विचारलं.

भिकारी म्हणाला– "मक्केची यात्रा करायचीय् मला."

"अरे पण .... भीक मागून पैसे जमवून मक्केला कसं जाता येईल तुला ? मक्केला जायचं म्हणजे केवढा तरी खर्च येतो ना?" सुलतानानं सवाल केला.

"छे-छे: !" भिकारी म्हणाला, "मला नाही फारसा खर्च यायचा. माझं गाढव आहे त्यावर बसून जाणार मी. वाटेत खायला भाकर हवी, तेवढ्यापुरते पैसे भीक मागून मिळतील मला."

"अरे पण –चोर-दरोडेखोरांची भीती नाही का वाटत तुला ?" – सुलतानानं शंका काढली.

"छे-छे: !" इब्राहीम नावाचा तो भिकारी हसत म्हणाला. "चोरा-दरोडेखोरांचं मला हो कसलं भय? चोरायला आहेच काय माझ्याकडं? पैसा साठवणाऱ्याला, श्रीमंताला चोरांचं भय !"

"अस्सं काय !" सुलतान विचार करीत म्हणाला, "मग तू असं कर. तुझी शिदोरी नि तुझं गाढव दे मला. मी मक्केची यात्रा करून येतो. मी परत येईतोवर माझ्या या वाड्यात राहा तूं."

इब्राहीम भिकाऱ्यानं सुलतानाचं म्हणणं मान्य केलं. त्याचं गाढव घेऊन सुलतान मक्केला निघाला; आणि

इब्राहीम सुलतानाच्या त्या वाड्यात राहू लागला.

सुलतानाला राजकन्या आहे नि खूप संपत्ती त्यानं साठवून ठेवली आहे हे थोड्याच दिवसात इब्राहीमला कळून चुकलं. त्याच्या मनात विचार आला– "काही दिवसांनी सुलतान मक्केहून परत येईल. मग मी पुन्हा भीक मागत फिरेन. त्यापेक्षा तो परतण्यापूर्वीच त्याची संपत्ती नि कन्या घेऊन दूर देशी पळून जावं हे बरं !" हा बेत पार पाडण्यासाठी त्यानं डाव रचला. राजकन्येला तो म्हणाला – "मक्केला जात असताना तुझ्या बापाला तुझ्याबद्दल कुणीतरी काहीतरी वेडंवाकडं सांगितलं. त्यामुळं तुझ्यावर तो फारच संतापलाय्. एवढंच नव्हे तर तुला ठार मारण्यासाठी त्यानं मारेकरीही पाठवले आहेत. तेव्हा शक्य तेवढी संपत्ती घेऊन आपण इथनं दूर पळून जाऊया. सुलतान परत येईपर्यंत कुठंतरी लपून राहूया. तो परत आला की तुझ्या चांगुलपणाबद्दल त्याची खात्री पटेल. मग तू परत ये."

आणि मग वाड्यातील रत्नांची थैली नि राजकन्या यांना घेऊन इब्राहीम एके रात्री गुपचूप वाड्याबाहेर पडला. तो स्वतः गाढवावर बसला होता. तर राजकन्या बसली होती घोड्यावर. त्यानं रत्नांची थैली गाढवावर लादली होती. रातोरात ती शहराबाहेर पडून बरीच दूर-वर गेली.

खूप दूरवर– एका गावाबाहेर पोचताच इब्राहीम

राजकन्येला म्हणाला– "घोड्यावरून खाली उतर." त्याबरोबर ती खाली उतरली, तेव्हा त्यानं गाढवावरची रत्नांची थैली काढून घोड्यावर चढवली आणि तो तिला म्हणाला,

"तुला मी इथंच सोडतोय्, तू काय हवं ते कर. ही रत्नं घेऊन मी घोड्यावर बसून दुसऱ्या देशाला चाललोय्. ही रत्नं तिथं विकून टाकीन नि मी श्रीमंत होईन.

राजकन्येला आधीच त्याचा संशय आला होता. आता तर त्याच्या दगलबाजीची खात्रीच पटली. मनातून ती खूप चिडली, पण गावाबाहेर त्या आडजागी आपण एकटं, मग त्याला अडवणार कसं नि रत्नांची थैली त्याच्याकडून सोडवणार कशी ? थैली सोडवून नाही घेतली तर भिकाऱ्यासारखी वणवण करायची पाळी आपल्यावर येईल.

तशी ती चाणाक्ष होती. इब्राहीमवर डाव उलटवण्याची शक्कल तिला त्याच क्षणी सुचली. त्याबरोबर खाली जमिनीकडे पाहात ती त्याला म्हणाली–

"रत्नांची थैली हलवताना ते एक रत्न जमिनीवर पडलंय् बघ !"

उभ्याउभ्याच जमिनीवर पाहात इब्राहीम बोलला– "मला तर कुठं दिसत नाही."

"नीट निरखून तर पाहा–म्हणजे दिसेल." ती म्हणाली.

तेव्हा इब्राहीम ओणवा होऊन जमिनीवर निरखून पाहू लागला. त्या बरोबर बाजूलाच पडलेला एक भला मोठा धोंडा तिनं चपळाईनं उचलला आणि इब्राहिमच्या लक्षात येण्यापूर्वीच तो त्याच्या डोक्यात घातला. लगेच इब्राहीम जागच्या जागी बेशुद्ध होऊन पडला.

आता राजकन्या झटपट पुढील कामगिरीला लागली. त्याचे कपडे तिनं काढून घेतले नि ते स्वत: घातले. पुरुषाचा वेश नीट केल्यावर ती घोड्यावर बसली नि भरधाव निघाली.

काही वेळाने ती एका शहरात पोचली. तिथं ती विश्रांतीसाठी घोड्यावरून खाली उतरली. घोड्या-वरची रत्नांची थैली पाहून तिच्या मनात विचार आला— "ही रत्नं मला काय करायचीत? त्यापेक्षा ही विकून पैसे करावेत त्यांचा काही सदुपयोग तरी करता येईल."

म्हणून मग तिनं ती सारी रत्नं विकून टाकली. अर्थात् त्यांचे खूप पैसे आले. त्या पैशातून तिनं त्या शह-रात स्वत:साठी एक छोटासा बंगला खरीदला. समीर हे नाव धारण करून ती तेथे राहू लागली मग तिनं एक शाळा बांधली नि म्हाताऱ्या लोकांसाठी आश्रमही स्थापन केला. काही पैसे तिनं गोर-गोरिबांना वाटले.

दानधर्मासाठी एवढे पैसे खर्च करणारा हा नवा श्रीमंत तरुण कोण शहरात आलाय्? — म्हणून शहरात त्याच्याबद्दल कौतुकानं चर्चा होऊ लागली. ते शहर त्या

देशाची राजधानी होती. साहजिकच तिथल्या राजपुत्राच्या कानावर त्याची कीर्ती गेली. कुतुहलानं राजपुत्र त्या तरुणाला–समीरला भेटायला गेला.

समीर बनलेल्या राजकन्येने विचारलं–"या देशाचे राजे ना तुम्ही?"

राजपुत्र म्हणाला, "होय ! तसं म्हणायला हरकत नाही. पण खरं म्हणजे माझे वडील या देशाचे राजे. ते आता म्हातारे झालेत; म्हणून त्यांच्या वतीनं मी राज्याचा कारभार पाहातो."

म्हणजे इथला सर्वात गरीब माणूस तुम्हीच म्हणायचे!"

राजपुत्रानं अचंब्यानं विचारलं, "वा:! असं कसं होईल? राज्याचा मालक म्हणजे ... अर्थातच मी सर्वात श्रीमंत नाही का?"

"अं-हं" ... समीररूपी – राजकन्या उद्गारली, "सर्वात गरीबच तुम्ही. कारण असं की तुमच्याखेरीज राज्यातला प्रत्येकजण काही ना काही कामधंदा करतो आणि पैसा कमावतो परंतु तुम्ही तर स्वत: काहीच कमावीत नाही. तुम्हाला मिळालेला पैसा तुम्हाला लोकांनी दिलेला असतो. अर्थात् तुम्ही एक प्रकारे भिकारीच!"

मग, लोकांच्या कसं उपयोगी पडता येईल ते तिनं राजपुत्राला सांगितलं. राजपुत्रानं तिच्या म्हणजेच समीरच्या सांगण्याप्रमाणं लोकांच्या कल्याणाचं कार्य आरंभलं.

काही दिवसांनी समीर हा पुरुष नसून पुरुष वेशातील स्त्री आहे अशी शंका राजपुत्राला येऊ लागली. एके दिवशी तो आपल्या आईला म्हणाला, "आई, समीर वरपांगी पुरुष दिसतो नि तसा तो वावरतो ते खरं; तरीपण माझं मन मला अशी ग्वाही देतं की समीर स्त्री आहे. पुरुष की स्त्री हे मी कसं ओळखून काढावं?"

राजपुत्राची आई म्हणाली–"तुझ्या बहिणीशी तो लग्न करतो का विचार."

खरं म्हणजे राजपुत्राची बहीण–राजकन्या होती, तिचं लग्न शेजारच्या देशाच्या राजाशी करण्याचा घाट प्रधानजी वगैरेनी घातला होता. परंतु तो राजा होता वयानं फार मोठा. अशा जवळजवळ म्हातारा असलेल्या राजाशी लग्न करण्यास राजकन्या अर्थातच तयार नव्हती. म्हणून, "समीरशी लग्न करतेस का?"– असं राजपुत्रानं बहिणीला विचारलं, तेव्हा ती आनंदानं कबूल झाली.

मग राजपुत्रानं समीरला विचारलं– "माझ्या बहिणीशी तुम्ही विवाह करावा अशी माझी इच्छा आहे. तुमची संमती आहे का ?"

समीर उत्तरला, "प्रथम तुमच्या बहिणीशी मला बोलू द्या. मग काय ते सांगतो."

राजपुत्राच्या बहिणीची आणि समीरची एकांतात भेट झाली. तेव्हा समीर तिला म्हणाला, "हे पाहा. खरं ते सांगते. मी काही पुरुष नाही. स्त्री आहे."

त्यावर राजकन्या म्हणाली, "पण तुम्ही पुरुष आहात असा सर्वांचा समज आहे ना ? मग झालं तर ! मी तुमच्याशी लग्न करायला तयार आहे. नाही तर शेजारच्या देशाच्या म्हाताऱ्या राजाशी माझं लग्न लावून देण्यात येईल. तुमच्याशी लग्न झाल्यानं ती आपत्ती तूर्त तरी टळेल. पुढचं पुढं पाहाता येईल !"

मग तिच्या इच्छेखातर समीरनं तिच्याशी लग्न केलं. म्हणजे बाह्यतः लोकांच्या दृष्टीनं तरी ती नवरा-बायको बनली.

पण एवढं झालं तरी समीर पुरुष असेल अशी खात्री राजपुत्राला अजून वाटत नव्हती. हे काहीतरी गौडबंगाल असावं असा त्याचा कयास होता. तो आपल्या आईला पुन्हा म्हणाला —

"आई, समीरनं माझ्या बहिणीशी लग्न केलं खरं, तरीपण समीर स्त्रीच असल्याचं अजूनही माझं मन ग्वाही देतंय्. खऱ्या–खोटयाचा पडताळा कसा घ्यायचा–खातर-जमा कशी करून घ्यायची ते मात्र समजत नाही."

राजपुत्राची आई म्हणाली—"तू म्हणतोस ते खरं असलं—समीर स्त्रीच असली, तर तिचं ते गुपित असलं पाहिजे. पुरुषाचा वेष घेऊन ती ते गुपित राखू पाहात असेल, पण तुला एक सांगते—कोणतीही स्त्री गुपित फार काळ सांभाळू शकत नाही. कसं-ना-कसं ते गुपित बाहेर पडल्याशिवाय राहणार नाही. समीरनं कोणता हेतू मनात

बाळगून इथं येऊन मुक्काम केला असेल कुणास ठाऊक! मात्र एक– इथून निघून जायचं त्यानं ठरवलं, आणि ती स्त्री असली, तर आपलं गुपित उघड करणारं पत्र तुला ठेऊन जाईल. पण तसं पत्र तुला न लिहिता समीर निघून गेला, तर मात्र तू खात्रीनं समज तो पुरुषच आहे!"

आणि आश्चर्य असं की– थोड्याच दिवसात एका नोकरानं एक पत्र आणून राजपुत्राला दिलं. त्या पत्रात म्हटलं होतं–

"शेजारच्या म्हाताऱ्या राजाशी लग्न करण्यास तुमची बहीण तयार नसल्यानं तिला मी माझ्याबरोबर घेऊन जात आहे. परंतु तिची बिलकूल काळजी करू नका. ती माझ्यापाशी सुरक्षित राहील. कारण मी पुरुष नसून स्त्री आहे. मी स्त्री आहे याची कल्पना तिला मी लग्नाआधीच दिली होती. पण म्हाताऱ्या राजाशी होणारं लग्न टाळण्यासाठी माझ्याशी लग्न करण्याचं नाटक करायला ती जाणून बुजून तयार झाली शेजारच्या देशापलीकडल्या छोट्या देशाच्या सुलतानाची मी कन्या आहे. मधल्या काही आकस्मिक आपत्तीमुळं मी तुमच्या देशात तात्पुरती आले होते आता मी परत माझ्या वडिलांकडं जात आहे. योग्य नवरा मिळताच तुमच्या बहिणीचं त्याच्याशी रीतसर लग्न लावून देऊ तुम्हाला कळविण्यात येईलच. तरी तिची काळजी करू नये."

ते पत्र वाचताच राजपुत्र एकदम उतावीळ होऊन

जवळजवळ ओरडलाच– "काही नाही. त्यांचा पाठलाग करून त्यांना मला गाठलंच पाहिजे."

इकडं सुलतान मक्केहून परत आलेलाच होता. आपली कन्या बेपत्ता झाल्यानं मात्र तो काळजीत होता. आता ती आली– सुखरूपपणं परत आली हे पाहून त्याला अतिशय आनंद झाला.

दरम्यान, समीरचा शोध घेत राजपुत्र तिथं आला. समीरनं आता अर्थातच पुरुषी वेश टाकून पूर्वीसारखा मूळचा स्त्री–वेश पेहरला होता. राजपुत्रानं तिची गाठ घेतली. तिला तो म्हणाला–"तू स्त्रीच आहे याची ग्वाही माझं मन मला पूर्वीपासूनच देत होतं. माझ्या आईलाही मी तसं बोललो होतो. माझं मनही तुझ्यावर तेव्हाच जडलं होतं– तुझ्यावर मी मनापासून प्रेम करीत होतो. माझ्या प्रेमाचा स्वीकार करून माझ्याशी लग्न करशील का ?"

ती कबूल झाली कारण, तिलाही तो मनापासून आवडला होता. सुलतानालाही हा जावई पसंत पडला. त्यानं आनंदानं त्यांचा विवाह करून दिला एवढेच नव्हे, तर सुलतान राजपुत्राला म्हणाला–

"या देशावर तूच राज्य कर. गरीब बनून मी मक्केला गेलो होतो. माझी मक्केची यात्रा सुखाची झाली. कारण माझ्यापाशी संपत्ती नसल्याने चोरांची भीती मला वाटत नव्हती. परंतु आता पुन्हा सुलतान बनल्यापासून मी चिंतेत पडलो आहे. रात्रीची मला धड झोपही

लागत नाही. तेव्हा मक्केची यात्रा करताना भाकरी-शिदोरी घेऊन गाढवावरून मी प्रवास केला. तसाच मी पुन्हा यात्रेला जाईन. आता मला माझ्या या मुलीचीही काळजी नाही. ती तुझीच झाली आहे. तुम्ही दोघंही या राज्याचा कारभार पहा. श्रीमंत होणं नि संपत्तीचा लोभ धरणं काही बरं नव्हे. कसली विवंचना नसलेली गरिबी हजार पटींनी श्रेष्ठ!"

## ६. तीन प्रश्न

फार वर्षापूर्वीची गोष्ट. इंग्लंडमध्ये त्यावेळी जॉन राजा राज्य करीत होता. तो दुष्ट होता. कॅन्टरबरीचा धर्मगुरू भारी श्रीमंत असून त्याच्या पंक्तीला रोज सरासरी शंभर लोक जेवतात असं एक दिवस त्याच्या कानी आलं. त्या धर्मगुरूकडे पन्नास नोकरांचा ताफा होता आणि राजापेक्षाही मोठ्या इतमामानं तो आपल्या मित्रमंडळीची बडदास्त ठेवीत असे. हे ऐकून राजाला त्याचा मत्सर वाटू लागला. त्याच्या मनानं घेतलं की हा धर्मगुरू भारीच मातबर बनून उन्मत्त झालाय्.

त्या धर्मगुरूला आपल्या समोर आणून हजर करण्याचा त्यानं हुकूम सोडला धर्मगुरू दरबारात दाखल होताच राजा म्हणाला, "तुझा वाडा माझ्याहून चांगला आहे आणि तुझ्या राजापेक्षाही जास्त पैसे तू खर्च करतोस असं माझ्या कानावर आलं आहे. अर्थात् तुझ्या ऐपतीबाहेर जादा पैसा तुझ्याकडे साठला आहे. शिवाय तू राजनिष्ठही नसावास असा संशय मला येतोय्."

धर्मगुरू उत्तरला, "हे पहा सरकार, मी खर्च करीत असलेली प्रत्येक दामदुगाणी माझ्या मालकीची असते."

राजा म्हणाला, "हां खरं आहे; आणि म्हणूनच तुझ्या ह्या गुन्ह्याबद्दल तुला मरण पत्करलं पाहिजे. माझ्या तीन प्रश्नाची उत्तरं तुला देता आली तरच ह्या शिक्षेतून तुझी सुटका होईल. पहिला प्रश्न, माझी किंमत किती पैसे? दुसरा, घोड्यावरून साऱ्या जगाचा फेरफटका करायला मला कमीतकमी किती अवधी लागेल? तिसरा, ह्यावेळी माझ्या मनात कोणता विचार चाललेला आहे?"

धर्मगुरू म्हणाला, "हे प्रश्न खरोखरीच अतिशय बिकट आहेत पण मेहेरबानी करून आपण मला तीन आठवड्यांचा अवधी द्यावा ह्यांची उत्तरं देण्यासाठी."

"बरं, तीन आठवडे देतो तुला" राजा म्हणाला, "पण तिसऱ्या आठवड्याच्या अखेरीस तू येऊन ह्याची उत्तरं द्यायला हवीस, नाही तर तुला फाशी मिळेल."

झालं. धर्मगुरू घरी परतला तो भारी चिंतेतच. ऑक्सफर्ड व केंब्रिजमधल्या विद्वान पंडितांना हे प्रश्न विचारीत तो फिरू लागला. पण बरोबर उत्तरं कुणीच दिली नाहीत.



अखेरीस ठरलेली मुदत भरायला तीन दिवस उरले. तितक्यात घरानजीकच एक धनगर भेटला त्याला.

"धन्यवाद धनीसाहेब! काय, राजेसाहेबांकडून कसली बातमी आणलीत?" धनगरानं विचारलं.

"वाईट, खेदजनक बातमी आहे बाबा." धर्मगुरू म्हणाला आणि त्यानं राजाशी झालेल्या मुलाखतीची हकीगत त्या धनगराला सांगितली.

धनगर म्हणाला, "त्याचं कसलं एवढं मनावर

घेता? शहाण्याला निरुत्तर करणाऱ्या प्रश्नांची उत्तरं कधीकधी एखादा मुर्खोबाही देऊन टाकतो, हे माहीत नाही का तुम्हाला? तुमचा घोडा अन् ते रूबाबदार कपडे जरा उसने द्या मला. मग लंडनला जाऊन देतो ह्या प्रश्नांची उत्तर. लोक म्हणतातच मी तुमच्यासारखा दिसतो म्हणून; तेव्हा राजाला काही ओळखता नाही येणार मला"

झालं. धर्मगुरूने त्याला आपले कपडे, घोडा व नोकरचाकर देऊन टाकले. दरबारात जाऊन पोचताच राजानं त्याला पहिला प्रश्न केला, "माझी किंमत किती पैसे? बोल." "सरकार, आपण आमचे राजे–अधिपती– म्हणजे इंग्रजीत सॉव्हरीन. सॉव्हरीनची किंमत वीस शिलिंग्ज, पण आपली किंमत आणखी पाच शिलिंगांनी जास्त आहे. कारण आपल्या डोक्यावर भरीला एक क्राऊनही आहे. तेव्हा त्या क्राऊनचे पाच शिलिंग मिळून आपली एकंदर किंमत पंचवीस शिलिंग्ज होते."

"वा!" राजा हसून म्हणाला, "इतक्या थोडक्या किंमतीचा मी असेन हे नव्हतं मला माहीत!" मग त्यानं दुसरा प्रश्न केला; "घोड्यावरून जगाचा फरफटका करायला मला कमीत कमी किती अवधी लागेल?"

"जर आपण सूर्याबरोबर उठलात व त्याच्या बरोबरीनं रात्रंदिवस घोडा पिटाळलात तर जगाची फेरी चोवीस तासात पुरी होईल." धनगर उत्तरला.

"वा:, छान!" राजा हसून म्हणाला, "इतक्या थोडक्या अवधीत फेरी संपेल असं नव्हतं वाटत मला! आता माझ्या तिसऱ्या प्रश्नाचं उत्तर दे. "ह्यावेळी माझ्या मनात काय चाललंय्?"

"त्यात काय अवघड आहे?" धनगर म्हणाला, "तुमच्या मनाची अशी समजूत आहे की मी कॅन्टरबरीचा धर्मगुरू आहे, पण ते बरोबर नाही मी त्याचा गरीबसा धनगर आहे! त्याला व मला माफी असावी, असा विनंती-अर्ज करायला आलोय मी."

ही सारी चतुर उत्तरं ऐकून राजा हसला, अतिशय खूष झाला. तो म्हणाला; "अगदी आजच्या आज कॅन्टर-बरीचा धर्मगुरू बनवून टाकतो मी तुला."

"छे छे! ते नाही जमायचं." धनगर म्हणाला, "कारण मला लिहिता येत नाही की वाचता येत नाही."

त्यावर राजा बोलला "मग मी असं करतो. तू हयात असेतोवर दर आठवड्याला चार पौंड देत जाईन मी तुला; आणि त्या जुन्या धर्मगुरूला म्हणावं मी क्षमा केलीय् त्याला आता."

## ७. शेंडेफळ

एका गावात एक शेतकरी रहात होता तो आणि त्याची बायको–दोघेच एका घरात राहायची. शेतकऱ्याची पन्नाशी उलटली, तो म्हातारा होऊ लागला, तरी मूल-



बाळ झाले नाही. म्हणून दोघेही नवरा-बायको खंत करायची. पण आश्चर्य असे की, आता मूल होण्याची आशा त्यांनी सोडली आणि म्हातारपणी का होईना मूल झाले–

आणि तोही मुलगा. दोघेही अर्थातच हर्षभरीत झाली. अपूर्वाईने झालेला मुलगा – त्याला तसेच साजेसे नाव ठेवायला हवे होते कसले तरी–काहीतरी–मनाला येईल ते नाव ठेवायला आईबापांचे मन घेईना. उभयतांनी खूप विचार केला, पण योग्य असे नाव काही सुचेना.

शेजारच्या-तालुक्याच्या गावी एक ज्योतिषी राहात होता. त्याचा सल्ला घ्यावा आणि काय ते नाव ठरवावे असे शेवटी ठरले. मग बायकोचा निरोप घेऊन म्हातारा त्या ज्योतिषाकडे गेला. ज्योतिषाने मुलाबद्दल प्रथम सगळी चौकशी केली. आणि, म्हातारपणी–उतारवयात झालेले मूल–शेंडेफळ म्हणून त्या मुलग्याचे नाव 'नोमोल' असे ठेवायला सांगितले. ज्योतिषाला एक रुपया दिला आणि ते नाव घेऊन म्हातारा आपल्या घरी परत निघाला. पण म्हातारपणी स्मरणशक्ती बेताचीच. त्यामुळे मुलाचे नाव विसरायला होऊ नये म्हणून त्याने त्या नावाचा जप चालवला! नव्हे, ते नाव मोठ्याने घोकतच तो वाट चालू लागला. पण चालता-चालता, थोड्या वेळाने मूळचे 'नोमोल' नाव विसरून 'नामेल' (अर्थ--'जाऊ देऊ नका') असे तो पुटपुटू लागला.

पुढे वाटेत त्याला नदी लागली. तिच्या कडेनेच त्याची वाट होती एके ठिकाणी नदीच्या किनाऱ्याला एक गलबत नांगरून ठेवले होते. म्हातारा त्या बाजूने जाऊ लागला, तेवढ्यात गलबताच्या मालकाने, नांगर उचलून

गलबत सोडण्यास आपल्या खलाशांना फर्मावले. खलाशांनी नांगर उचलला आणि किनाऱ्यावरच्या खुंटाला बांधलेले गलबताचे दोरखंड ते सोडू लागले. इतक्यात 'नामेल, नामेल' (जाऊ देऊ नका--जाऊ देऊ नका) असे त्यांच्याकडे पाहात, मोठ्यांदा घोकत म्हातारा तिथून जाऊ लागला. त्याचे शब्द ऐकून खलाशांनी आपले काम थांबवले आणि मालकाला जाऊन सांगितले– "मालक, तो म्हातारा तिथं जाता–जाता सांगतोय–'गलबत जाऊ देऊ नका' म्हणून."

मालक म्हणाला–"थांबवा त्याला, आणि विचारा काय म्हणणं आहे त्याचं ते!"

खलाशी धावत आले आणि त्यांनी म्हाताऱ्याला धरून आणले. मालकाने विचारले– "काय हो म्हातारबोवा, 'जाऊ देऊ नका' असं का म्हणताय तुम्ही?

पण आपण घोकत असलेले नाव विसरून जाऊ या भीतीनें म्हातारा त्याला उत्तर देण्याच्या भानगडीत पडला नाही. त्याच्याकडे दुर्लक्ष करीत, 'नामेल, नामेल' असे घोकत तो आपल्या वाटेला लागला.

हवामान चांगले आहेसे पाहून, उत्तम मुहूर्तावर आपण गलबत प्रवासाला लोटीत असता या म्हाताऱ्याने मध्येच नस्ता अडथळा आणला म्हणून मालक चिडला. "त्या अडाणी म्हाताऱ्याला चांगलं ठोकून काढा."असे त्याने आपल्या खलाशांना सांगितले आणि खलाशांनी खरो-

खरीच मालकाच्या हुकमाची अंमलबजावणी केली. म्हाताऱ्याला धरून ते बदडू लागले. म्हाताऱ्याने त्यांच्या हातून कशीबशी सुटका करून घेऊन पळ काढला म्हणून थोडक्याशाच मारपिटीवर निभावले.

पण या साऱ्या गडबडगोंधळात, घोकत असलेले नाव म्हातारा पार विसरला. आणि 'नोहोरबोर होले' असे जे सुचले ते नवेच नाव घोकत तो पुढच्या मार्गाला लागला. (या नव्या शब्दाचा अर्थ होता 'च्–च्–च्...! भलतंच काहीतरी!')

नवे नाव मोठ्याने घोकत जाता जाता म्हाताऱ्याला वाटेतल्या गावच्या बाजारात, भपकेबाज पण चटेरीपटेरी कपडे पेहरलेला एक माणूस भेटला. म्हाताऱ्याचे ते शब्द कानी पडताच त्या माणसाला वाटले– "माझे विचित्र प्रकारचे कपडे पाहून म्हातारा माझी टिंगल उडवतोय्! ...." मग काय? तो थोडेच ऐकून घेणार? त्याने चिडून हातातल्या छडीचे दोन फटके म्हाताऱ्याला लगावले. जास्त मार चुकवण्यासाठी म्हाताऱ्याने पुन्हा पळ काढला. त्या गडबडीत, घोकत असलेले शब्द तो पुन्हा विसरला, आणि "कमाल आहे बुवा" या अर्थाचा नवा सुचला तो शब्द घोकत घरच्या वाटेला लागला.

वाटेत दोघे गावकरी त्याच्या बाजूने आपसात थट्टामस्करी करीत गेले. त्यांनी अर्थातच म्हाताऱ्याच्या तोंडचे ते शब्द ऐकले. त्याने मोठ्याने ते शब्द उच्चारले त्या

अर्थी आपल्या बोलण्याला उद्देशूनच त्याने हा शेरा मारला असला पाहिजे, असा त्यांचा समज झाला. "म्हाताऱ्याला दुसऱ्यांच्या गोष्टीत नस्ता चोंबडेपणा करायला कुणी सांगितलं?—" असे पुटपुटत त्यांनी त्याला एकएक ठोसा लगावला.

मारपिटीचे हे फारच झाले ! .... म्हातारा बिचारा जेरीस आला ; पार वैतागला. घोकत असलेले ताजे शब्दही तो आता विसरला. नाव घोकण्यापायी एवढा मार खावा लागला—जळो ते नाव ! .... आता तोंड मिटून चालायचं ! ... आणि त्यानंतर घरी पोचेपर्यंत त्याने पुन्हा म्हणून कसलाच शब्द तोंडातून बाहेर काढला नाही. हो ! ... पुन्हा कुणाकडून तरी मार खाण्याची पाळी यायला नको ! ....

घर गाठल्यावरोबर म्हाताऱ्याने ओटीवरच्या बाकावरच बैठक मारली आणि कण्हत कण्हत, दुखणारे अंग तो हलक्या हातांनी कुरवाळू लागला. त्याचे कण्हणे ऐकून बायको घरातून बाहेर आली. विचारू लागली— "असं झालं तरी काय ? पडलाबिडलात की काय कुठं ?"

"मी पडलो बिडलो नाही कुठं—मार मात्र पडला मला ..!" म्हातारा वैतागत बोलला; आणि वाटेत मार खाण्याचे कसकसे प्रसंग आले व त्याने थोडक्यात सांगितले. ते ऐकून तिचा जीव कळवळला. लगेच घरात

जाऊन तिने औषधी तेलाची बाटली आणली आणि ते तेल नवऱ्याच्या अंगाला ती लावू लागली. तेलाच्या त्या मालिशानं म्हाताऱ्याला जरा बरे वाटले. त्याचा वैतागही निवळला. ते पाहून बायको म्हणाली–

"नशिबाचे भोग भोगावे लागतात ! ते जाऊ द्या. आता आपल्या बाळाकडं पाहून विसरून जा सारं ! .... हो ! ... पण काय हो, ज्योतिषानं नाव कोणतं ठेवायला सांगितलं बाळाचं ?"

म्हातारा बोलला– "अग, या मारपिटीत ते नावच विसरून गेलो ना !"

बायको बोलली– –"बऽऽरं ! .... जाऊ द्या ! तुमच्या जिवापुढं नावाचं काय एवढं ? धडपणी घरी आलात हेच खूप झालं आता जरा विसावा घ्या आणि माझं रांधप होईपर्यंत पडवीतली भाताची उरलेली ती नोमोल (शेवटची) रोपटी पाठीमागल्या परड्यात लावून टाका म्हणजे झालं ! .... लौकर लावली नाहीत तर वाळून जातील !

'नोमोल' शब्द कानी पडताच म्हातारा आनंदून गेला ; त्याचा शीण पार निघून गेला. ताडकन उठून उभा राहात तो म्हणाला–"वा वा ! .... अग ऽऽ, हे– 'नोमोल' नावच तर आपल्या बाळासाठी सांगितलं त्यानं." लगेच बायकोवर खेकसत तो बोलला–"हे नाव तुला आधीच सुचलं असतं, तर त्या ज्योतिषाकडं जायची

पायपीट आणि लोकांची मारपीट चुकली नसती का ?"

आता—बायकोला बिचारीला काय ठाऊक— तेच नाव ज्योतिषी सुचवणार म्हणून ? पण नावापायी नवऱ्याला एवढे हाल भोगावे लागले त्यामुळे तो करवादणे साहजिकच आहे, हे जाणून ती मुकाटयाने घरात गेली. घरात बाळ हातपाय नाचवीत गोधडीवर मारे हसत खिदळत पडला होता. त्याला पाहून नवऱ्याचा राग मावळून जाईल अशी कल्पना तिला सुचली. त्याबरोबर त्याला उचलून घेऊन ती बाहेर आली. नवऱ्याला म्हणाली— —"बघा तरी छकुला नोमोल कसा हसतोय् तो ! लबाडाला नाव आवडलेलं दिसतय् !"

हसऱ्या बाळाला पाहून म्हाताऱ्या बापाचा राग खरोखरीच मावळला. बायकोकडून बाळाला आपल्याकडे घेऊन, हसत कौतुकाने त्याला तो आंदोळू लागला.

आणि मग लगेच काहीतरी गोडधोड करून त्यांनी बाळाला रीतसर 'नोमोल' नाव ठेवले.

म. ग्रं.

BVBK-0400102

दा. १०२
कि. किशोर ..६२..